आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२७ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- श्रीकृष्णजन्मोत्सव सर्वत्र साजरा / महाराष्ट्रात आज दहिहंडीचा थरार

- राजकोट इथं नौदलाच्या सहकार्यानं छत्रपती शिवाजी महाराजांचा १०० फूट उंचीचा पुतळा उभारावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचं दीपक केसरकर यांचं आश्वासन

- वैद्यकीय व्यावसायिकांच्या सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होणार

**आणि**

- बदलापूर प्रकरणाच्या चौकशी समितीचा प्राथमिक अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर

**<><><><><>**

श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी काल सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी झाली. राज्यात आज दहिकाल्याचा सण उत्साहात साजरा होत असून विशेषतः मुंबई, ठाण्यात ठिकठिकाणी गोविंदाचा थरार रंगत आहे. अनेक दिवसाच्या सरावानंतर गोविंदा मंडळे उंचच उंच बांधलेल्या दहीहंड्या फोडत आहेत. या दहीहंड्यांसाठी लाखो रुपयांची बक्षिसेही लावण्यात आलेली आहेत. सहा ते आठ थरांचे हे मानवी मनोरे पाहण्यासाठी जागोजागी गर्दी झाली आहे. अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून...

**व्हॉईस कास्ट- कौस्तुभ**

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणं हा अपघात असून त्या जागी राज्य शासनानं भारतीय नौदलाशी समन्वय साधून १०० फूट उंचीचा पुतळा उभारावा, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचं मंत्री आणि सावंतवाडीचे आमदार दीपक केसरकर यांनी सांगितलं. त्यांनी राजकोट इथं पुतळा जिथे कोसळला त्या ठिकाणाची पाहणी केली आणि त्याच जागी १०० फुटी पुतळा उभारण्यासंबंधी मुंबईला परतल्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून आराखडा तयार करण्याचं आश्वासन दिलं. या ठिकाणी धक्का उभारून सिंधुदुर्गपर्यंत फेरीद्वारे वाहतूक सुरू केली, तर हे स्मारक पर्यटकांसाठी आकर्षणाचं केंद्र होऊ शकतं, असंही केसरकर म्हणाले. पुतळा कोसळणं हा एक अपघात आहे आणि त्या दृष्टीनेच सर्वांनी त्याकडे पहावं. या अपघाताची चौकशी शासन करेल, असं आश्वासन केसरकर यांनी दिलं.

**<><><><><>**

दरम्यान हा पुतळा कोसळण्याचं कारण शोधण्यासाठी आणि पुतळा पुनर्स्थापित करण्यासाठी एक पथक रवाना करण्यात आल्याची माहिती भारतीय नौदलानं एका निवेदनाद्वारे दिली आहे. या संदर्भात राज्य सरकार आणि तज्ज्ञांच्या सहकार्यानं काम सुरू असल्याचं नौदलानं म्हटलं आहे. राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फुटांचा पुतळा काल कोसळला. त्यानंतर नौदलानं आज हे निवेदन जारी केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या राज्यसभेतच्या दोन जागांवर धैर्यशील पाटील आणि नितिन पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र विधीमंडळानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

<><><><><>

वैद्यकीय व्यावसायिकांची सुरक्षा तसंच कामाच्या ठिकाणची परिस्थिती याबाबत सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. या बैठकीचे अध्यक्ष केंद्र सरकारचे कॅबिनेट सचिव असतील. दलाच्या इतर सदस्यांमध्ये केंद्रीय गृह सचिव, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष, सर्जन, व्हॉईस ॲडमिरल, एम्सचे संचालक आणि न्यूरोलॉजी विभागाचे माजी प्राध्यापक यांचा समावेश आहे. कोलकात्यातल्या राधागोविंद कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात एका महिला निवासी डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानं, वैद्यकीय व्यावसायिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली होती.

<><><><><>

महाराष्ट्रात बदलापूर इथल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग आणि राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष यांच्या समितीचा प्राथमिक अहवाल शासनाला सादर झाला आहे. या अहवालातली निरीक्षणं तपास यंत्रणांना सादर करण्यात येणार असून शिक्षण विभागाअंतर्गत स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्यात येणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. दोषी ठरलेल्यांना पाठीशी घातलं जाणार नाही,

असंही त्यांनी स्पष्ट केलं. महिलांवरचे अत्याचार रोखण्यासाठी मोबाईलवर पॅनिक बटन देता येईल, यासाठी महिला आणि बालविकास तसंच गृहविभागामार्फत निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातल्या सर्व शाळांमध्येही असं बटण देता येईल, यासाठी निर्णय घेतला जाईल, असं केसरकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नागरिकांच्या तक्रारींचं ठराविक कालमर्यादेत, सुलभपणे आणि योग्यरीत्या निवारण व्हावं या उद्देशानं केंद्रानं सार्वजनिक तक्रारींच्या हाताळणीबाबत सर्वंकष मार्गदर्शक तत्त्वं जारी केली आहेत. याअंतर्गत नागरिकांना आपल्या तक्रारी www.pgportal.gov या संकेतस्थळावर नोंदवता येणार असून त्यांच्या तक्रारींचं त्यावरच एक खिडकी स्वरुपात निवारण केलं जाणार आहे. सार्वजनिक तक्रारींचं तातडीनं आणि योग्य पद्धतीनं आणि कार्यक्षमपणे निवारण करण्यासाठी केंद्र सरकारची सर्व मंत्रालयं आणि विभागांना नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करणं बंधनकारक असणार आहे. पुरेशा संसाधनांसह सर्व योजना आणि त्यासंबंधित घडामोडींची माहिती असलेल्या यंत्रणेसह केवळ तक्रार निवारणासाठी समर्पित विभाग सुरू करावेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक नियमावलीनुसार तक्रारी मार्गी लावल्यानंतर त्याची नागरिकांना एसएमएस किंवा ईमेलद्वारे माहिती द्यावी लागणार आहे.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या वारणा विद्यापीठाला समूह विद्यापीठाचा दर्जा देण्याचा निर्णय रविवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या

समूह विद्यापीठात वारणानगर इथल्या तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, या महाविद्यालयासह यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, या महाविद्यालयांचा समावेश करून समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

**<><><><><>**

राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी, गगनबावडा, आजरा आणि चंदगड तालुक्यात अतिवृष्टी झाली असून, धरण क्षेत्रातही जोरदार पाऊस होत आहे. सर्वच धरणं पूर्ण क्षमतेने भरली असून, पाण्याचा विसर्ग वाढल्याने नद्यांच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. **पंचगंगा** नदीचं पाणी पात्राबाहेर आल्यानं ४२ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**सातारा** जिल्ह्यातल्या कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस होत असल्यामुळे धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे आज सकाळी ११ वाजता कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाचे दोन्ही संच सुरू करण्यात आले असून, दोन हजार शंभर घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी नदीपात्रात सोडण्यात येणार आहे. यामुळे कोयना नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात** पैठण इथल्या जायकवाडी धरणाचा

पाणी साठा ५६ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात सध्या अहमदनगर तसंच नाशिक जिल्ह्यातल्या पाणलोट क्षेत्रातून ८४ हजार ४४६ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याची आवक होत आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला ३ ऑक्टोबरपासून दुबई इथं सुरुवात होणार आहे. आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं काल विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा केली.

विश्वचषक स्पर्धेत भारत, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, न्यूझिलँड आणि पाकिस्तानचा समावेश गट अ मध्ये आहे, तर दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज, बांगलादेश आणि स्कॉटलँड यांचा समावेश गट ब मध्ये करण्यात आला आहे. प्रत्येक संघ दोन गट सामने खेळतील, दोन्ही गटामधले प्रत्येकी दोन सर्वोत्कृष्ट संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. ६ ऑक्टोबरला भारत आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी लढत देईल. ४ ऑक्टोबरला न्यूझिलँड, ९ ऑक्टोबरला श्रीलंकेविरोधात तर १३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाविरोधात भारतीय संघाचा सामना होणार आहे. १७ आणि १८ ऑक्टोबरला विश्वचषकाचे उपांत्य सामने खेळले जाणार आहेत. तर २० ऑक्टोबरला अंतिम सामना होईल.

<><><><><>

नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांच्या पार्थिवावर आज दुपारी नायगाव इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे

चिरंजीव रणजीत चव्हाण यांनी अग्नी दिला. नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, तसंच मराठवाड्यातले इतर खासदार यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी विदर्भात अनेक ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**